# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागपूर

**अधीक्षक अभियंता (यां.),**
प्रशासकीय ईमारत अ,2 रा मजला, सी.पी
क्लबच्या बाजुला ,तेलंगखेडी,
नागपूर-440001

दुरध्वनी क्र.:-0712-2556671
फॅक्स:-0712-2556671
**ई-मेल:-semmjpwmngp@gmail.com**

जा.क्र. मजीप्रा/अअ(यां.)/तांशा(यां.)/ 359/ २०२४ दि:-25/07 /२०२४

**प्रति,**
**मा.मुख्य अभियंता,**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रादेशिक विभाग,
छ.संभाजीनगर.

**विषय:**-महारष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजनेची अंदाजपत्रके व आराखडे सादर करणेबाबत.

**संदर्भ:**-आपले पत्र क्र. मजीप्रामंल/तांशा(यां)/960/ 2024 दि.24.07.2024.

वरील विषयी महारष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजनेच्या अंदाजपत्रक संदर्भिय पत्राअन्वये तपासणी व मंजुरी करीता प्राप्त झाले आहे. त्यानुसार प्राप्त प्रस्तावाची संकल्पनात घेण्यात आलेल्या लेव्हल्स,पाईपचे व्यास व पाण्याची डिमांडची खात्री स्थापत्य शाखेकडून झाल्याचे गृहित धरुन अंदाजपत्रकाची तपासणी करण्यात आली आहे.अंदाजपत्रकात आवश्यक दुरुस्त्या लाल शाईने करण्यात आल्या आहे.दुरुस्त्या केल्यानंतर अंदाजपत्रकाची उपांगनिहाय सुधारीत किंमत खालील प्रमाणे येत आहे.

| Sr. No. | Name of Work | Submitted Amount Nett Rs | Corrected Amount Nett Rs |
|---|---|---|---|
| 1 | Non Clog Submersible Sewage Pumping Machinery at Wet Well | 71993816.00 | 69351901.00 |
| 2 | SCADA & Automation for Pumping Machinery at Wet Well | 2774051.00 | 2774051.00 |
| 3 | Solar Power Plant at Wet Well | 18864398.00 | 18864398.00 |
| 4 | 11 KV Express Feeder including MSEDCL Connection Charges at Wet Well | 21500000.00 | 21500000.00 |
| | **TOTAL Nett (Without GST) Rs.** | **115132265.00** | **112490350.00** |

योजनेच्या स्थापत्य व यांत्रिकी कामाच्या एकत्रित अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेण्याकरीता यांत्रिकी उपांगास खालील अटींच्या अधीन राहुन शिफ़ारस करण्यात येत आहे.

**अटी:-**

1) कार्यव्ययी अंदाजपत्रक तयार करतांना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील तलांकानुसार संकल्पन करुन या तलांकाची खातरजमा करण्यात यावी व बदल होत असल्यास तशी दुरुस्ती करणे आवाश्यक राहील.
2) तांत्रिक व प्रशासकिय मंजुरी झाल्यानंतर कार्यव्ययी अंदाजपत्रकास प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावरील आवश्यकतेनुसार परिमाण घेऊन अंदाजपत्रकास मंजुरी घेणे आवश्यक राहील.
3) फ़्लो डायग्रामवर म.जी.प्रा.च्या संबंधितांच्या स्वाक्षरी नसुन कार्यव्ययी अंदाजपत्रक तयार करतांना सदर तलांकांमध्ये किंवा पाईपच्या व्यासामध्ये बदल झाल्यास त्यानुसार संकल्पन सुधारीत करुन अंतिम करणे आवश्यक राहील.

4) म.रा.वि.वि.कंपनीकडुन उपलब्ध करावयाच्या विद्युत पुरवठ्याच्या कामाकरीता योजनेतील स्थापत्य / यांत्रिकी कामाचा आढावा घेऊन प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करणे आवश्यक राहील.महावितरणच्या संबंधितांकडुन कामाचा सर्व्हे करुन पुढ़ील कार्यवाही करणे आवश्यक राहील.

5) एक्स्प्रेस फ़िडरच्या कामाच्या अंदाजपत्रकात ढोबळ तरतुद घेण्यात आली असुन महावितरण कंपनीकडून दरांबाबत व लांबीबाबत खात्री करणे आवश्यक आहे.तसेच Demand charges, Supervision charges, security deposit charges ची तरतुद करणे आवश्यक राहील.

6) प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर काही बदल झाल्यास संकल्पनामध्ये त्यानुसार दुरुस्त्या करुन अंदाजपत्रकास सुधारीत तांत्रिकी मान्यताची कार्यवाही करणे आवश्यक राहील.

7) प्रस्तावातील पंपाचे Head व discharge चे संकल्पन करतांना स्थापत्य शाखेकडुन प्राप्त फ़्लो डायग्राम मध्ये नमुद तलांक गृहीत धरुन पंपाचे संकल्पन अंतिम करण्यात आले आहे. सदर तलांक व पाण्याची डिमांड योग्य असल्याची खात्री आपले स्तरावर स्थापत्य शाखेकडुन पुनश्च करणे आवश्यक राहील.

8) सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता सावली विरहित जागा उपलब्ध असल्याची खात्री करणे आवश्यक आहे, तसेच शुद्ध पाण्याच्या संप वरील सौर उर्जेवर चालणारे पंपांकरीताचे सोलर पॅनल करीता देखिल सावली विरहित जागा उपलब्ध असल्यची खात्री करणे आवश्यक राहील

आपले माहिती व पुढ़ील कार्यवाही करीता सविनय सादर.

**सहपत्र**:-वरील प्रमाणे

(पत्र क्र.359/ २०२४ दि.25/07/२०२४)

(मनिष बारडकर)

**अधीक्षक अभियंता(यां)**

**प्रत**: अधीक्षक अभियंता,म.जी.प्रा.मंडळ,लातुर यांना माहिती व पुढिल कार्यवाही करीता सस्नेह अग्रेषित.

**प्रत**:-कार्यकारी अभियंता (यां),म.जी.प्रा.मंडळ, लातुर यांना माहिती व पुढिल कार्यवाही करीता.

**प्रत**:-कार्यकारी अभियंता,म.जी.प्रा.विभाग,लातुर यांना माहिती व पुढिल कार्यवाही करीता.

E.E.(M)
E.E.(3)